| CNR NO :- MHAM170006172022 | फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ३/२०२२ |
| --- | --- |
| | सौ. उज्वला मानकर<br>–विरुध्द–<br>सागर मानकर |

## आदेश निशानी क्रमांक ५
## (पारित दिनांक १७.१०.२०२५)

प्रस्तुत अर्ज अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १२५ (यापुढे सोयीसाठी थोडक्यात “फौ.प्र.सं” असे संदर्भित) अन्वये अंतरिम पोटगीसाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदाराच्या अर्जाची थोडक्यात हकीगत खालीलप्रमाणे**:

२) अर्जदार यांचा विवाह गैरअर्जदार यांचे सोबत दिनांक ०५.०६.२०१९ रोजी हिंदु रितरिवाजाप्रमाणे गुरुकुज मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती येथे संपन्न झाला. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडे त्याच्या संयुक्त कुटुंबात धामणगाव रेल्वे, ता. धामगणगाव रेल्वे, जि. अमरावती येथे नांदायला गेली. गैरअर्जदार हे परतवाडा येथील चंद्रभाग धरणावर प्रकल्प अभियंता या पदावर काम करीत होते. त्यांना दरमहा रक्कम रुपये ३५,०००/– पगार मिळतो.

३) अर्जदार ही लग्नानंतर संयुक्त कुटुंबामध्ये तिचे पती, तिच्या पतीची आई, वडील व बहिणीसह राहत होती. सुरुवातील अर्जदाराला गैरअर्जदाराच्या कुटूंबियांनी दोन ते तिन महिने चांगली वागणुक दिली. त्यानंतर गैरअर्जदार व त्यांचे कुटुंबिय हे अर्जदाराला शारिरिक व मानसिक त्रास देत होते. गैरअर्जदार हा अर्जदाराला "तु सासु–सासऱ्यांसमोर नाच, पत्ते खेळ, मला तुझ्याकडुन मुलबाळ नको व मला मुल दत्तक घायचे आहे व तु माझी लग्नाची पत्नी असुन सुध्दा मला इतर बायकांसोबत लिव्हींग रिलेशनशिप मध्ये राहायचे आहे, तसेच दिनांक २९.१०.२०१२ रोजी माझे पती म्हणजे गैरअर्जदार यांनी मला व्हॉटस ॲपवर व्हिडीओ कॉल केला व म्हटले की, तु तुझ्या अंगावरचे कपडे काढ मला पाहायचे आहे व मला तुझा व्हिडीओ बनवायचा आहे आणि सोशल मिडीयावर शेअर करायचा आहे" अशा भाषेत म्हणत होते. अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार अर्जदाराला असे सांगत असे की "जर मी माझी कंपनी सुरू केली तर मी तुला सोडून देईन आणि मला तुझी गरज नाही आणि मी इतर महिलेसोबत पुन्हा लग्न करेल”.

४) अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार व त्यांचे घरातील सभासद हे टि.व्ही, फ्रिज व इतर साहित्याची मागणी करत होते कारण तिच्या वडीलांनी लग्नामध्ये दिले नव्हते. तसेच गैरअर्जदार व त्यांचे घरातील सदस्य हे अर्जदाराला सोन्याचे दागिने आणि इतर वस्तुंची मागणी करत होते. अर्जदार गैरअर्जदाराने केलेल्या मागण्या अमान्य केल्या तर गैरअर्जदार व त्याचे घरातील सदस्यांनी अर्जदाराला मारहाण करुन

अत्यंत निर्दयपणे वागणुक देत होते. गैरअर्जदाराने त्याला नविन कंपनी स्थापन करावयाची असल्याने त्याने अर्जदाराच्या वडीलांना रक्कम रुपये २,००,०००/– ची मागणी केली. परंतु, अर्जदाराच्या वडीलांनी मागणी पुर्ण करण्यास नकार दिला असता अर्जदाराने घडलेली घटनेबाबत त्यांच्या लग्नामध्ये मध्यस्थी असलेले निताताई जगताप, वसंतराव कराळे, पप्पुभाऊ सोटे यांना सांगीतली. गैरअर्जदार हे मध्यस्थी वसंतराव कराळे यांना नेहमी सांगायचे की, अर्जदाराला नांदवायचे नाही, जर अर्जदाराला आमच्या परिवारात नांदायचे असेल तर अर्जदाराला आमच्या अटी व शर्तीचे पालन करावे लागेल. जसे की, अर्जदाराने तिच्या आईवडीलांसोबत संपर्क ठेवायचा नाही, मोबाईलचा उपयोग करायचा नाही, गैरअर्जदार यांच्या वर्तणुकीबद्दल शेजारी व नातेवाईकांना सांगायचे नाही या सर्व अटी व शर्तीचे पालन करावे असे सांगीतले. अर्जदाराने प्रेमापोटी सर्व शर्तीचे पालन केले. परंतु, गैरअर्जदार यांच्या वर्तणुकीत कोणताही फरक पडला नाही.

५) अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार यांची बहिण नामे प्रिती सुरेश गोरले, प्रिती गोरले हीचे पती नामे सुरेश गोरले व गैरअर्जदार यांची आई नामे शालिनी मानकर हे एकत्र कुटुंबात गैरअर्जदार यांच्या घरात राहत असत. गैरअर्जदार याचे पालकाच्या अनुपस्थीतीत गैरअर्जदाराची बहिणी प्रिती ही अर्जदार यांना क्रुरपणे मारहाण करीत होते व "तु ढाबा उघड व तिथे काम कर आणि मला पैसे दे व तु तुझ्या अंगावरची साडी काढ आणि ती मला दे" असे म्हणत असे. गैरअर्जदार यांचे जावाई अर्जदाराचा

विनयभंग करण्याचा प्रयत्न करीत होते. जेव्हा अर्जदार ही गैरअर्जदार यांचे जावाई यांना चहा, नास्ता, जेवण देत असतांना गैरअर्जदार यांच्या शरीराला स्पर्श करुन वाईट विचाराने असभ्य हावभाव करीत होते. गैरअर्जदाराची बहिण व जावाई अर्जदाराला क्रुरतेने मारहाण करुन तिचा मानसिक व शारिरीक छळ करीत होते.

६) अर्जदार पुढे असे कथन करते की, दिनांक १४.१०.२०२० रोजी अर्जदार ही दोन तिन दिवसासाठी तिच्या माहेरी आली असता गैरअर्जदार याचा अर्जदाराच्या वडीलांना फोन आला होता व म्हणाले की, त्यांना त्याच्या कामाकरीता चार ते सहा महिने लागतील तोपर्यंत अर्जदाराला तुमच्या घरी राहु दया व गैरअर्जदाराने अर्जदाराला नांदायला नकार दिला. त्यानंतर अर्जदाराच्या वडीलांनी गैरअर्जदार व त्यांच्या परिवारातील सदस्यासोबत संपर्क साधला असता त्यांनी अर्जदार हीला त्यांच्या घरी नांदावयास नकार दिला आणि तेव्हापासुन अर्जदार ही तिच्या आईवडीलांच्या घरी माहेरी राहत आहे. अर्जदार पुढे असे कथन करते की, दिनांक २८.११.२०२० मध्यस्थी वसंतराव कराळे व गैरअर्जदार हे अर्जदार यांच्या घरी कुऱ्हा येथे आले व गैरअर्जदाराने सोन्याचे दागिने, मोबाईल, शैक्षणिक कागदपत्रे, अर्जदाराचे कपडे अर्जदाराला परत करण्याचे आश्वासन दिले. परंतु, गैरअर्जदाराने वरील साहित्य हे सोबत आणले नाही व मध्यस्थी यांच्यासमोर गैरअर्जदार हे अमरावती भाडयाच्या रुम करुन अर्जदाराला वागविण्याचे सांगीतले. अर्जदार, गैरअर्जदार, अर्जदार हिचे वडील व मध्यस्थी यांनी सदर

गोष्टीला मान्यता दिली. अर्जदार ही गैरअर्जदारासोबत अमरावती येथे दोन महिने राहीली. त्यानंतर फेब्रुवारी मध्ये गैरअर्जदाराने अर्जदाराला तिच्या सासरी एकत्र कुटूंबामध्ये राहण्याकरीता आणले. अर्जदार ही फेब्रुवारी–२०२१ ते मे–२०२१ पर्यंत सासरी एकत्र कुटूंबामध्ये गैरअर्जदारासोबत नांदली. परतु, गैरअर्जदार व त्याच्या परिवारातील सदस्यांनी अर्जदाराला चांगली वागणुक न देता तिला कोणत्याही कारणावर शारिरीक व मानसिक त्रास दिला. तसेच गैरअर्जदार व त्याच्या परिवारातील सदस्या तिला विनाकारण मारहाण करीत होते. सदरची बाब ही अर्जदाराने तिच्या वडीलांना सांगीतली. म्हणुन जुन–२०२१ मध्ये अर्जदाराचे वडील अर्जदाराचे सासरी धामणगाव येथे आले व त्यांनी अर्जदाराला चांगले वागविण्याची गैरअर्जदारांना विनंती केली. परतु, गैरअर्जदार यांनी काहीही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर अर्जदार ही तिच्या वडीलांसोबत माहेरी कुऱ्हा येथे आली. तेव्हापासुन अर्जदार ही तिच्या माहेरी तिच्या आईवडीलांच्या दयेवर जगत आहे. अर्जदार पुढे असे कथन करते की, तिने गैरअर्जदारासोबत नांदण्याच पुर्ण प्रयत्न केला. परंतु, गैरअर्जदार व त्याच्या कुटूंबियांनी शारिरीक व मानसिक छळ केला. म्हणुन, नैराश्यातुन बाहेर आल्यानंतर तिने दिनांक २८.०७.२०२१ रोजी अर्जदाराने गैरअर्जदाराविरुध्द पोलीस स्टेशन, दत्तपुर येथे भारतीय दंड संहितेचे कलम ४९८–अ अंतर्गत फिर्याद नोंदविली. गैरअर्जदार यांनी दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती येथे खोटी विवाह विच्छेदनाकरीता एचएमपी क्रमांक १३७/२०२१ प्रमाणे प्रकरण दाखल केले.

७) अशा परिस्थीतीत अर्जदार ही माहेरी रहात असुन, तिच्याकडे उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार हा परतवाडा येथील चंद्रभाग धरण येथे प्रकल्प अभियंता म्हणुन नोकरीवर असुन त्याला दरमहा रक्कम रुपये ३५,०००/– इतके उत्पन्न मिळते. गैरअर्जदारावर त्याच्या शिवाय कोणाचीही जबाबदारी नाही. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदाराकडुन अंतरिम पोटगीच्या स्वरुपात दरमहा रक्कम रुपये ५,०००/– मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज सादर केलेला आहे.

८) गैरअर्जदार याला नोटीस तामील होऊन गैरअर्जदार याने सदरच्या अर्जावर निशानी क्रमांक २२ वर त्याचे म्हणणे दाखल केले आहे. त्याने त्याच्या लेखी जबाबामध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह झाल्याचे मान्य केले आहे. लग्नाच्या वेळी गैरअर्जदार हा परतवाड येथे खाजगी नोकरी करीत होता. अर्जदार ही विद्याभारती महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत होती. लग्नानंतर १५ ते २० दिवस अर्जदार व गैरअर्जदार त्यांच्या सयुक्त कुटूंबामध्ये धामणगाव रेल्वे येथे राहीले. १५ ते २० दिवसानंतर गैरअर्जदार हा कांडली, परतवाडा येथे त्याच्या नोकरीवर रुजू झाला. काही दिवसांनी अर्जदार व तिचे आई व वडील तसेच गैरअर्जदार यांचे आई वडील हे धामणगाव वरुन परतवाडा येथे गैरअर्जदार याच्या भाडयाने राहत असलेल्या रुमवर आले. दोन ते तीन दिवसानंतर दोघांचे आई वडील हे आपआपल्या गावी निघुन गेले आणि अर्जदार व गैरअर्जदार हे परतवाडा येथे भाडयाच्या रुममध्ये राहु लागले.

९) गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, अर्जदार व गैरअर्जदार हे सणाच्या दिवशी धामणगाव किंवा कुऱ्हा येत जात असत. अर्जदार ही पहील्या दिवाळी करीता तिच्या माहेरी म्हणजे कुऱ्हा येथे दिनांक २८.१०.२०१९ रोजी गेली. दिनांक १२.११.२०१९ रोजी गैरअर्जदाराने अर्जदार हीला कुऱ्हा येथुन परतवाडा येथे आणले. परतवाडा येथे आल्यानंतर अर्जदार हीच्या वागण्यामध्ये फरक पडला होता व ती गैरअर्जदाराला अपशब्दात बोलत होती. त्यानंतर अर्जदार ही दिनांक २२.०१.२०२० रोजी पहील्या संक्रातीकरीता माहेरी जात असतांना गैरअर्जदारासोबत साडीच्या कारणावरुन भांडण केले. अर्जदार ही दिनांक ३०.०१.२०२० रोजी धामणगाव येथे परत आली. धामणगाव येथे परत आल्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदार हीला परत परतवाडा येथे आणले. परतवाडा येथे आल्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदाराला रक्कम रुपये १,००,०००/– ते रक्कम रुपये २,००,०००/– अर्जदार हीच्या वडीलांना गरज असल्यामुळे मागणी केली. अर्जदार हीच्या वडीलांनी सुध्दा गैरअर्जदार यांना फोन करुन पैश्याची मागणी केली होती.

१०) गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, जानेवारी–२०२० व फेब्रुवारी–२०२० मध्ये अर्जदार ही असभ्यपणे वागत होती. अर्जदार हीने गैरअर्जदाराला थापड सुध्दा मारली होती. गैरअर्जदार यांच्या आई वडीलांनी आंतरजातीय विवाह केल्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदाराला "तू मिलावट आहे"अशा अपशब्दात बोलत होती. मार्च–२०२० ते जुन–२०२० मध्ये लॉकडाऊन असल्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार हे धामणगाव येथे राहण्यासाठी आले. लॉकडाऊन मध्ये अर्जदार ही गैरअर्जदारासोबत विचित्र

वागुन गैरअर्जदाराला पैश्याची मागणी करीत होती. दिनांक १४.०३.२०२० रोजी गैरअर्जदाराने अर्जदार हीच्या वडीलांना रक्कम रुपये १,५०,०००/– दिले.

११) जुन–२०२० गैरअर्जदाराच्या कर्यालयाने गैरअर्जदाराला तापी व गोदावरी नदीचा सर्व्हे करण्याचे कार्यभार दिला होता. त्याकरीता गैरअर्जदार हे नाशिक येथे गेले. दिनांक २०.०७.२०२० रोजी गैरअर्जदार हे धामणगाव येथे नाशिक वरुन परत आले. दिनांक २८.०७.२०२० रोजी अर्जदार हीने गैरअर्जदाराला अर्जदाराला तिच्या माहेरी तिच्या आई वडीलांकडे सोडुन देण्याचे सांगीतले. त्याप्रमाणे गैरअर्जदार यांनी अर्जदार हीला दिनांक २८.०७.२०२० रोजी अर्जदाराला तिच्या माहेरी सोडले. अर्जदार ही दिनांक ०८.०८.२०२० रोजी धामणगाव येथे आली तेव्हा गैरअर्जदार हे तिला परतवाडा येथे घेऊन गेले. सदरहु कालावधीमध्ये अर्जदार ही गैरअर्जदारासोबत विचित्र वागत होती. गैरअर्जदार याने अर्जदार हीला समजविण्याचा प्रयत्न केला असता अर्जदार हीने तिच्या आई वडीलांना व मध्यस्थी प्रणिता जगताप हीला तक्रार करेल असे सांगीतले. सदरहु कालावधी अर्जदार ही गैरअर्जदारासोबत कोणत्याही कारणावरुन भांडण करीत असे.

१२) गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, दिनांक १४.१०.२०२० रोजी अर्जदार ही गैरअर्जदारासोबत भांडण करुन तिच्या आई वडीलांकडे माहेरी निघुन गेली. त्यानंतर अर्जदार ही दसरा व दिवाळी सणाकरीता अर्जदार तिच्या सासरी आली नाही. त्यावेळेस अर्जदार ही गैरअर्जदाराला नोकरी सोडण्याचा हट्ट करीत होती व गैरअर्जदाराने

नोकरी सोडली तर ती नांदायला येईल. नाईलाजास्तव गैरअर्जदार याने ऑक्टोंबर–२०२० मध्ये नोकरी सोडुन गैरअर्जदार हा धामणगाव येथे आला व अर्जदाराला त्याबाबत माहीती दिली असता अर्जदार हीने दुसरी अट टाकली की, गैरअर्जदार अमरावती येथे राहत असेल तर ती येणार अथवा ती येणार नाही. गैरअर्जदाराने नाईलाजस्तव सदरहु अट मान्य केली. दिनांक २८.११.२०२० रोजी अर्जदार हीने गैरअर्जदाराला कुऱ्हा येथे अर्जदार हीचे कपडे व दागिने घेऊन बोलविले. दिनांक २८.११.२०२० रोजी गैरअर्जदाराने अर्जदार हीला सोन्याचे दागीने कराळे काका यांच्या उपस्थीतीत सपूर्त केले. अर्जदार हीने तिच्या वडीलांच्या ताब्यात दागिने दिले. त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार हे भाडयाच्या रुमध्ये कॅम्प, अमरावती येथे राहायला गेले. अर्जदार ही दिनांक २८.११.२०२० ते ०४.०२.२०२१ पर्यंत अमरावती येथे राहीली.

१३) गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, दिनांक ०४.०२.२०२१ रोजी अर्जदार ही तिच्या माहेरी गैरअर्जदाराला दाताचा त्रास असल्यामुळे गेली. त्यावेळी गैरअर्जदाराने डॉ. लोखंडे यांच्याकडे उपचाराकरीता गेले असता डॉक्टरांनी गैरअर्जदार यांना एन्डोस्कॉपी करण्याचा सल्ला दिला. गैरअर्जदाराच्या वडीलांनी अर्जदार हीला माहिती दिली असता अर्जदार ही आली नाही. दिनांक ०४.०२.२०२१ रोजी अर्जदार ही माहेरी गेली असता तिचा मोबाईल अमरावती येथील रुममध्ये राहीला होता. गैरअर्जदार हे आजारातुन बरे झाल्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदाराचा मोबाईल पाहीला असता गैरअर्जदाराने अर्जदार व तिच्या वडीलांचे आणि मध्यस्थी श्रीमती प्रणिता जगताप यांचे संभाषन जे अर्जदाराने पहीले रेकॉर्ड केले होते ते ऐकले. सदरहु संभाषनावरुन अर्जदार,

तिचे वडील व मध्यस्थी महीला यांनी गैरअर्जदाराच्या परीवारा विरुध्द कट रचल्याचे त्यांना कळाले. तसेच अर्जदाराच्या फोन वरुन अर्जदाराचे स्वप्नील वाढोणकर, रा. भोई पुरा, कुऱ्हा याच्यासोबत प्रेमसंबंध असल्याचे कळले. अर्जदार ही स्वप्नील सोबत लग्न करणार होती परंतु त्याची जात वेगळी असल्यामुळे अर्जदाराच्या वडीलांनी सदरहु लग्नास परवानगी दिली नाही. गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, गैरअर्जदाराने अर्जदार, तिचे वडील व मध्यस्थी महीला यांचे ऐकलेल्या संवादावरुन अर्जदारासोबत एका छताखाली राहील्यास व संसार केला तर त्याच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. म्हणुन, गैरअर्जदार याने फॅमिली कोर्ट, अमरावती येथे हिंदु विवाह अधिनियम, १९५५ चे कलम १० नुसार प्रकरण दाखल केले आहे. सदरहु प्रकरण आज रोजी प्रलंबीत आहे. सदरहु प्रकरण प्रलंबीत असतांना अर्जदार हीने गैरअर्जदार व त्याच्या परीवारा विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–अ प्रमाणे धामणगाव रेल्वे येथील कोर्टामध्ये नि.फौ. प्र. क्रमांक १७९/२०२१ दाखल केले. दिनांक २३.०९.२०२१ रोजी अर्जदार हीने गैरअर्जदाराच्या वडीलाविरुध्द पोलीस स्टेशन, गाडगे नगर येथे फिर्याद दिली. गैरअर्जदार यांचे वडील रुग्णालयात भरती असतांना दिनांक २४.०२.२०२३ रोजी त्यांचा मृत्यु झाला. गैरअर्जदाराच्या वडीलांच्या मृत्युनंतर गैरअर्जदार हे त्याच्या आईसोबत धामणगाव रेल्वे येथे राहत आहे. गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, गैरअर्जदाराला कोणतीही नोकरी नाही. अर्जदार ही गैरअर्जदारासोबत राहण्यास तयार नाही. म्हणुन, गैरअर्जदाराने सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

१४) अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

१५) अर्जदाराच्या व गैरअर्जदारांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

१६) अर्जातील मागणीचा विचार करता, खालील मुद्दे विचारार्थ उत्पन्न झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष खालील नमुद कारणांसाठी त्यापुढे नमुद करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदाराने प्रथमदर्शनी सिध्द केले आहे काय की, गैरअर्जदाराने कोणतेही कारण नसतांना अर्जदार हीचा निर्वाहसाठी उपेक्षा केली आहे किंवा तिचा निर्वाह करण्यास नकार दिला? | **होकारार्थी.** |
| ०२. | अर्जदाराने स्वतःचा पालनपोषण करण्यास असमर्थ असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे काय? | **होकारार्थी.** |
| ०३. | अर्जदार ही प्रथमदर्शनी सिध्द करते काय की, गैरअर्जदार हा अर्जदार हीला खावटी देण्यासाठी सक्षम आहे काय? | **होकारार्थी.** |
| ०४. | अर्जदार ही गैरअर्जदाराकडुन अंतरीम खावटी मिळण्यास पात्र आहे काय? | **होकारार्थी.** |
| ०५. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

१७) सर्वप्रथम हे नमुद करणे गरजेचे आहे की, पक्षकारांदरम्यांनचे नातेसंबंध दोन्ही बाजुदरम्यांन विवादीत नाही. तसेच अर्जदार व गैरअर्जदार हे ऐकमेकांपासुन विभक्त राहतात हे दखील विवादीत नाही. त्यामुळे प्रस्तुतच्या अर्जातील गुणवत्ता किंवा इतरत्र दोन्ही बाजुच्या पक्षकारांदरम्यांन अविवादीत असलेल्या बाबींच्या प्रकाशात तपासणे गरजेचे ठरते.

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ३ करीता</u> :-**

१८) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ अन्वये अंतरीम खावटी मिळण्यासाठी अर्जदार हीने हे प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक आहे की, गैरअर्जदार याने तो पुर्णपणे अर्जदार हीचा सांभाळ करण्यास सक्षम असतांना अर्जदार हीला कोणतेही कारण नसतांना तिचा निर्वाह व सांभाळ करण्यास नकार दिला आहे. तसेच अर्जदार ही तिचा स्वतःचा सांभाळ करण्यास सक्षम नाही. त्यामुळे अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जाची गुणवत्ता वरनमुद व्याख्येच्या प्रकाशात तपासणे गरजेचे ठरते.

१९) अर्जदाराचा अर्ज व त्यासमर्थनार्थ तिच्या सत्यापनाप्रमाणे विवाहाच्या काही दिवसानंतर गैरअर्जदारांनी तिला वरनमुद केल्याप्रमाणे विवीध कारणांवरुन शारिरीक व मानसिक त्रास दिला असे प्रथमदर्शनी दिसुन येते. गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या वतीने

करण्यात आलेल्या सदरच्या अर्जास उत्तर देण्यासाठी न्यायालयात हजर होऊन त्याचा लेखी जबाब दाखल केला. अशा परिस्थितीत अभिलेखावर अर्जदाराच्या वतीने सादर करण्यात आलेल्या दस्तांवरुन, अर्जदार ही गैरअर्जदारपासुन वेगळी रहात असल्याची बाब विवादीत नाही. तसेच गैरअर्जदार याने अर्जदार हीच्या उदरनिर्वाहसाठी कोणतीही तरतुद केल्याबाबत अभिलेखावर आलेले नाही. अशा परिस्थितीत पती म्हणुन तिची देखभाल करण्याची जबाबदारी गैरअर्जदाराची असतांना देखील त्याने तिच्या पालनपोषणाची काही एक सोय केल्याचे अभिलेखावरुन दिसुन येत नाही किंवा तसा बचाव देखील त्याच्या वतीने घेण्यात आलेला नाही.

२०) एकुणच अर्जदाराच्या वतीने अर्जासमर्थनार्थ सादर केलेल्या तिच्या सत्यापनाचे शपथपत्र गैरअर्जदारांनी तिचा छळ केला किंवा नाही व अर्जदार ही संयुक्तीक कारण असल्यामुळे गैरअर्जदारपासुन विभक्त राहत आहे अशा स्वरुपाचा महत्वाचा संपरिक्षेलायक मुद्दा प्रस्तुत अर्जाच्या सुनावणीवेळी निर्माण झालेला आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४९८–अ अन्वये फिर्याद पोलीस स्टेशन, दत्तापुर येथे दाखल केल्याबाबत दस्त अभिलेखावर तिच्या समर्थनार्थ दाखल केलेले आहे. यावरुन असे दिसुन येते की, अर्जदार ही संयुक्तीक कारण असल्यामुळे तसेच गैरअर्जदारापासुन तिचा शारिरीक व मानसिक छळ होत असल्यामुळे विभक्त राहत आहे. अर्जदार ही बऱ्याच दिवसांपासुन गैरअर्जदारापासुन वेगळे राहत

असतांना देखील गैरअर्जदाराने तिच्या पालनपोषणाची काही एक सोय केलेली नाही. गैरअर्जदाराने तो अर्जदार हीचे पालनपोषण करण्यास पुर्णपणे सक्षम असतांना देखील अर्जदार हीचा उदरनिर्वाह व सांभाळ करण्यास कोणतेही कारण नसतांना नकार दिलेला आहे. तसेच अर्जदार ही तिचा स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे असा कोणताही दस्त गैरअर्जदाराने अभिलेखावर दाखल केला नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ अन्वये अर्जदार ही गैरअर्जदाराकडुन अंतरीम खावटी मिळण्यास पात्र असल्याचे दिसुन येते. अशा परिस्थितीत अर्जदाराने तिचा अर्ज सकृतदर्शनी सिध्द केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक ४ साठी :–**

२१) अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे गैरअर्जदार हा नौकरीतुन दरमहा रक्कम रुपये ३५,०००/– इतके उत्पन्न मिळते. मात्र गैरअर्जदारांच्या वतीने सदरची बाब विवादीत करण्यात आलेली असून, अर्जदाराने गैरअर्जदाराला वर नमुद प्रमाणे उत्पन्न मिळत असल्याचे दर्शविण्यासाठी कागदोपत्री पुरावा अर्जदाराने दाखल केला नाही.

२२) अर्जात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदाराचे उत्पन्न असल्याचे दर्शविण्यासाठी तशा पध्दतीचे दस्तऐवज अर्जदारास उपलब्ध झाले असते. परंतू,

अर्जदाराने सदरचे दस्त अभिलेखावर सादर केलेले नाहीत. अशा परिस्थितीत वरनमुद विश्लेषण व अविवादीत करण्यात आलेले तथ्य, गैरअर्जदाराचे विवादीत उत्पन्न, आजची महागाई आणि अधिनियमाच्या उद्देश्याच्या प्रकाशात, गैरअर्जदार यास पती म्हणुन अर्जदाराला तिच्या पालनपोषणासाठी दरमहा रुपये ३,०००/– इतकी अंतरिम पोटगी देण्याबाबत आदेशीत करणे न्यायोचित ठरेल. वरनमुद विश्लेषणाच्या प्रकाशात विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष होकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत असुन, मुद्दा क्र.५ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदाराने अर्जदाराला अर्ज दाखल तारखेपासुन ते पुढील आदेशापावेतो दरमहा अंतरिम पोटगी म्हणुन रुपये ३,०००/– (तिन हजार फक्त) देण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदारास मोफत देण्यात यावी.

स्वा/-

**दिनांक : १७.१०.२०२५.**
**स्थळ : तिवसा.**

**(रोहिणी वि. मनोरे)**
**दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर),**
**तिवसा**